


दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

।शुक्रवार, दि. १ मे २०२६। वर्ष १ ।अंक २६ ।पाने २। DIGITAL EDITION







» Selected

### बुद्ध पौर्णिमेनिमित्त राज्यपालांच्या शुभेच्छा

**मुंबई:** महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी बुद्ध पौर्णिमेनिमित्त राज्यातील नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. बुद्ध पौर्णिमेच्या मंगल दिनानिमित्त मी राज्यातील तसेच देशभरातील जनतेला हार्दिक शुभेच्छा देतो. भगवान बुद्धांची बंधुभाव, प्रेम, करुणा आणि अहिंसेची शिकवण आज विशेष प्रासंगिक आहे.

---

### पुतिन आणि ट्रम्प यांच्यात प्रदीर्घ चर्चा

मॉस्को: रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात सुमारे दीड तास दूरध्वनीवरून महत्त्वपूर्ण चर्चा झाली. रशियाचे राष्ट्राध्यक्षीय सल्लागार युरी उशाकोव्ह यांनी या संभाषणाची पुष्टी केली आहे. या चर्चेदरम्यान, पुतिन यांनी 'व्हाईट हाऊस करस्पाँडंट्स असोसिएशन'च्या कार्यक्रमात राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यावर झालेल्या हत्येच्या प्रयत्नाचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला.

## एक्झिट पोल फेटाळले; टीएमसीला २२६ जागांचा विश्वास, ईव्हीएमबाबतही व्यक्त केली चिंता

# बंगालमध्ये 'मां, माटी, मानुष'चेच सरकार येणार!

## सर्वांचे लक्ष लागले मतमोजणीकडे; कडव्या स्पर्धेमुळे राजकीय वातावरण तापले

जन सम्राट टाईम्स

**कोलकाता। पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यातील निवडणुकांनंतर समोर आलेल्या एक्झिट पोल्सना स्पष्ट शब्दांत नाकारत पुन्हा एकदा "मां, माटी, मानुष"चे सरकारच सत्तेत येईल, असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. तृणमूल काँग्रेस (टीएमसी) ला तब्बल २२६ जागा मिळतील, असा दावा करत त्यांनी विरोधकांवरही अप्रत्यक्ष टीका केली.**

- भाजप-टीएमसीमध्ये अटीतटीची लढत अपेक्षित
- ईव्हीएम छेडछाडीची भीती; प्रशासनाला सतर्क राहण्याचे आवाहन
- मतमोजणीकडे देशाचे लक्ष; निकाल ठरणार निर्णायक



नुकत्याच जाहीर झालेल्या विविध एक्झिट पोल्समध्ये भारतीय जनता पक्ष आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात चुरशीची लढत होणार असल्याचे भाकीत वर्तवण्यात आले आहे. काही अंदाजांनुसार दोन्ही पक्षांना जवळपास समान जागा मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मात्र, या सर्व अंदाजांना ममता बॅनर्जी यांनी फेटाळून लावत, "जनतेचा कौल स्पष्टपणे आमच्या बाजूने आहे," असे सांगितले. "एक्झिट पोल्स हे केवळ अंदाज असतात. प्रत्यक्ष वास्तव वेगळे असते. तळागाळातील जनतेचा तृणमूल काँग्रेसवर पूर्ण विश्वास आहे," असे ममता बॅनर्जी यांनी नमूद केले. त्यांनी बंगालमधील जनतेचे आभार मानत एक व्हिडिओ संदेशही प्रसिद्ध केला असून, विजय निश्चित असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे. ईव्हीएमबाबत शंका व्यक्त या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ममता बॅनर्जी यांनी ईव्हीएम छेडछाडीची भीतीही व्यक्त केली आहे. "निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखली गेली पाहिजे," असे म्हणत त्यांनी प्रशासनाला दक्ष राहण्याचे आवाहन केले आहे.

### धार्मिक श्रद्धेतून विजयाची प्रार्थना

दरम्यान, मतदानानंतर गुरुवारी ममता बॅनर्जी यांनी माता बांगलामुखी देवीचे दर्शन घेत विजयासाठी प्रार्थना केली. धार्मिक श्रद्धा आणि जनतेचा आशीर्वाद या दोन्ही गोष्टी आपल्या पाठीशी असल्याचे त्यांनी सांगितले.

### राजकीय समीकरणांवर देशाचे लक्ष

पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी टीएमसी आणि प्रमुख विरोधी पक्ष भाजप यांच्यातील लढत यंदा अत्यंत अटीतटीची मानली जात आहे. एक्झिट पोल्समध्ये दर्शवलेल्या कडव्या स्पर्धेमुळे राजकीय वातावरण तापले असून, प्रत्यक्ष निकाल काय लागणार याकडे देशाचे लक्ष लागले आहे.

### निर्णायक दिवसाची प्रतीक्षा

आता सर्वांचे लक्ष मतमोजणीच्या दिवसाकडे लागले आहे. धार्मिक श्रद्धा आणि जनतेचा आशीर्वाद या दोन्ही गोष्टी आपल्या पाठीशी असल्याचे त्यांनी सांगितले. एक्झिट पोल्सचे अंदाज खरे ठरणार की ममता बॅनर्जींचा बहुमताचा दावा यशस्वी ठरणार, याचा फैसला निकालानंतरच होणार आहे.



जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## बेंगळुरूमध्ये पावसाचा हाहाकार; ७ जणांचा दुर्दैवी मृत्यू

जन सम्राट टाईम्स

**बेंगळुरू :** बेंगळुरूमध्ये बुधवारी झालेल्या मुसळधार पावसाने आणि सोसाट्याच्या वाऱ्याने भीषण रूप धारण केले. शिवाजीनगर परिसरातील प्रसिद्ध बोरिंग आणि लेडी कर्जन रुग्णालयाची संरक्षक भिंत कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या भीषण अपघातात ३ मुलांसह एकूण ७ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी संध्याकाळी बेंगळुरू शहरात अचानक ढगांच्या गडगडाटासह आणि जोरदार वाऱ्यासह मुसळधार पाऊस सुरू झाला. पावसाचा जोर इतका प्रचंड होता की अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली.

शिवाजीनगर परिसरात पावसापासून वाचण्यासाठी काही पथारी व्यावसायिक आणि पादचारी बोरिंग रुग्णालयाच्या जुन्या संरक्षक भिंतीचा आडोसा घेऊन उभे होते. मात्र, पावसाच्या दबावामुळे आणि वाऱ्याच्या वेगामुळे ही जुनी भिंत अचानक कोसळली आणि खाली उभे असलेले लोक ढिगाऱ्याखाली गाडले गेले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. ढिगाऱ्याखालून सात मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. जखमींना



तातडीने उपचारासाठी बोरिंग रुग्णालयातच दाखल करण्यात आले आहे. मृतांमध्ये रस्त्यावर किरकोळ साहित्य विकणाऱ्या व्यावसायिकांचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून 5 लाखांची मदत जाहीर

या दुर्घटनेनंतर कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी घटनास्थळाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

* **मदत निधी:** मृतांच्या नातेवाईकांना राज्य सरकारकडून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे.

* **चौकशीचे आदेश:** ही भिंत नेमकी कशामुळे कोसळली आणि ती धोकादायक स्थितीत होती का, याची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

### बुद्ध पौर्णिमेच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिल्या देशवासीयांना शुभेच्छा

नवी दिल्ली | राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुद्ध पौर्णिमेच्या पूर्वसंध्येला देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. आपल्या संदेशात राष्ट्रपती म्हणाल्या की, हा पवित्र दिवस भगवान बुद्धांचे पृथ्वीवरील आगमन, त्यांना मिळालेली ज्ञानप्राप्ती आणि त्यांचे महापरिनिर्वाण या ऐतिहासिक घटनांचे प्रतीक आहे. अनेक आव्हानांना तोंड देणाऱ्या आजच्या जगात, भगवान बुद्धांची शिकवण प्रत्येकाला शांती, सहिष्णुता आणि परस्पर सौहार्दाच्या मार्गावर चालण्यासाठी प्रेरणा देते. त्यांनी लोकांना भगवान बुद्धांचे आदर्श आत्मसात करण्याचे आणि शांततापूर्ण, सर्वसमावेशक व न्यायपूर्ण समाज घडवण्यासाठी योगदान देण्याची प्रतिज्ञा घेण्याचे आवाहन केले.

# उत्तर प्रदेशच्या विकासाला 'एक्स्प्रेस' गती!

## मोदींच्या हस्ते गंगा एक्स्प्रेस वेचे उद्‌घाटन; काशी विश्वनाथाचे घेतले दर्शन

जन सम्राट टाईम्स

**हरदोई/वाराणसी| प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशच्या प्रगतीमधील मैलाचा दगड ठरणाऱ्या आणि राज्याचा प्रदीर्घ महामार्ग असलेल्या गंगा एक्स्प्रेस वे' चे बुधवारी उद्‌घाटन केले. हरदोई जिल्ह्यात आयोजित एका विशेष कार्यक्रमात या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. "हा महामार्ग केवळ रस्ता नसून उत्तर प्रदेशच्या विकासाची नवी 'लाईफलाईन' ठरेल," असा विश्वास यावेळी पंतप्रधानांनी व्यक्त केला. गंगा एक्स्प्रेस वे हा उत्तर प्रदेश राज्याचा सर्वात लांब महामार्ग आहे. ५९४ किलोमीटर लांबीचा हा सहा पदरी महामार्ग उत्तर प्रदेशातील आतापर्यंतचा सर्वात मोठा एक्स्प्रेस वे आहे. हा महामार्ग पश्चिम उत्तर प्रदेशातील मेरठला थेट पूर्व उत्तर प्रदेशातील प्रयागराजशी जोडतो. हा मार्ग पश्चिम, मध्य आणि पूर्व अशा तिन्ही क्षेत्रांतील १२ जिल्ह्यांमधून जाणार आहे, ज्यामुळे या भागांतील दळणवळणाची समस्या दूर होणार आहे. या एक्स्प्रेस वेमुळे उद्योग, व्यापार आणि रोजगाराच्या संधींना मोठी चालना मिळेल, असे पंतप्रधानांनी आपल्या भाषणात नमूद केले. श्री काशी विश्वनाथ मंदिरात प्रार्थना एक्स्प्रेस वेच्या उद्‌घाटनानंतर



पंतप्रधानांनी वाराणसीतील धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला.

* **विधिवत पूजा:** पंतप्रधानांनी श्री काशी विश्वनाथ मंदिरात जाऊन भगवान शंकराची षोडशोपचार पूजा केली आणि देशाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली.

* **'त्रिशूळ आणि डमरू' धारण:** पूजेनंतर पंतप्रधान मोदी जेव्हा मंदिराबाहेर आले, तेव्हा त्यांच्या हातात 'त्रिशूळ' आणि 'डमरू' पाहायला मिळाले. हे छायाचित्र सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून, त्यांच्या या रूपाने शिवभक्तांचे लक्ष वेधून घेतले.

* **भाविकांशी संवाद:** मंदिर परिसरात उपस्थित असलेल्या इतर भाविकांची पंतप्रधानांनी विचारपूस केली आणि अभिवादन स्वीकारले.मुलांसोबतचा जिव्हाळा काशी विश्वनाथ मंदिर भेटीदरम्यान पंतप्रधानांचा एक हळवा कोपरा पुन्हा एकदा दिसून आला. मंदिरात आलेल्या लहान मुलांशी पंतप्रधान मोदींनी अत्यंत आपुलकीने संवाद साधला. त्यांच्याशी गप्पा मारत त्यांना आशीर्वाद दिले, ज्यामुळे मंदिर परिसरात एक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. एकूणच, कालचा दिवस उत्तर प्रदेशसाठी 'विकास' आणि 'वारसा' यांचा संगम ठरला. एका बाजूला अत्याधुनिक 'गंगा एक्स्प्रेस वे'च्या माध्यमातून भविष्यातील प्रगतीची पायाभरणी झाली, तर दुसरीकडे काशी विश्वनाथाच्या दर्शनाने सांस्कृतिक मुळांशी असलेले नाते पुन्हा एकदा अधोरेखित झाले. हा महामार्ग आगामी काळात राज्याच्या अर्थव्यवस्थेला नवी झळाळी देणारा ठरणार आहे.

# फलोदी सट्टा बाजार देतोय बंगालमध्ये सत्तापालटाचे संकेत!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई| प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुका २०२६ साठी फलोदी सट्टा बाजाराचा अंदाज एक्झिट पोल्सच्या अनुसरूनच दिसत आहेत. पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुदुचेरी या पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांच्या निकालांपूर्वी फलोदी सट्टेबाजीचा बाजार जोरात सुरू आहे. नवीनतम दर आणि अंदाज पश्चिम बंगालमध्ये बदलाचे संकेत देत आहेत, याशिवाय केरळात राजकीय समीकरणे बदलू शकतात.

फलोदी सट्टा मार्केट अंदाजानुसार, पश्चिम बंगालमधील सर्वात मोठी स्पर्धा आहे. या पाच राज्यांमधील सर्वात मोठी लढत पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक आहे. फलोदी बेटिंग मार्केटनुसार, येथे ममता बॅनर्जी यांचे स्थान धोक्यात आल्याची चिन्हे दिसत आहेत. बंगाल: सुवेंदू अधिकारी फेव्हरीट पश्चिम बंगालमधील एकूण जागा - २९४ सरकार स्थापन करण्यासाठी बहुमत - १४८ फलोदी सट्टा बाजार अंदाज - भाजप: १४६–१४९ टीएमसी: १४०–१४३ इतर (काँग्रेस, सीपीआयएम, आयएसएफ): एकेरी



अंकांपुरते मर्यादित यावेळी पश्चिम बंगालमधील सट्टेबाजी बाजार ममता बॅनर्जींपेक्षा सुवेंदू अधिकारी यांच्यावर अधिक विश्वास ठेवत आहे. यावरून हे स्पष्ट होते की, ममता दीदींचे पद धोक्यात येऊ शकते.

### तामिळनाडूमध्ये डीएमकेचे जोरदार पुनरागमन

तामिळनाडूमध्ये एकूण जागा - २३४ सरकार स्थापन करण्यासाठी बहुमत - ११८ फलोदी सट्टा बाजार अंदाज - डीएमके: १४०-१४३ एआयएडीएमके: ४५–६५ टीव्हीके: ७-९ तामिळनाडूमध्ये एम.के. स्टॅलिन आपली आघाडी कायम राखत आहेत, तर एआयएडीएमकेचा आलेख घसरत असल्याचे दिसत आहे.

### आसाममध्ये भाजपचे वर्चस्व कायम

आसाममधील एकूण जागा - १२६ सरकार स्थापन करण्यासाठी बहुमत - ६४ फलोदी सट्टा बाजार अंदाज - एनडीए: ९८-१०० जागा एएसएम: २३-२५ जागा आसाम विधानसभा निवडणुकीत हिमंता बिस्वा सरमा यांचा प्रभाव कायम असून, त्यांना स्पष्ट बहुमत मिळत असल्याचे दिसून येत आहे.

**पुदुचेरीमध्ये अटीतटीची लढत**

पुदुचेरीमधील एकूण जागा - ३० बहुमतासाठी लागणारा आकडा १६ आहे. फलोदी सट्टा बाजार अंदाज - एनडीए: १४-१८ इंडिया आघाडी: १४-१७ टीव्हीके: काही जागा (किंगमेकरची भूमिका बजावण्याची शक्यता) एन. रंगस्वामी येथे आघाडीवर असल्याचे दिसत असले तरी, ही लढत अत्यंत अटीतटीची आहे. अंतिम निकालांमुळे सरकार स्थापनेला एक नवीन वळण मिळू शकते.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# होर्मुझ'वरून पुन्हा युद्धाचे ढग; कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी उसळी

## अमेरिकेच्या भूमिकेनंतर जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती ७ टक्क्यांनी वधारल्या

जन सम्राट टाईम्स

**वॉशिंग्टन/तेहरान**इराण: आणि अमेरिका यांच्यातील तणाव आता अत्यंत स्फोटक वळणावर पोहोचला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचा 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' संदर्भातील नवा प्रस्ताव फेटाळून लावला असून, इराणवर "अल्पावधीचे पण अत्यंत शक्तिशाली" लष्करी हल्ले करण्याची तयारी सुरू केल्याचे वृत्त आहे. या घडामोडींमुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर चार वर्षांतील उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत. 'एक्सिओस'च्या अहवालानुसार, अमेरिकन सेंट्रल कमांडचे प्रमुख ॲडमिरल ब्रॅड कूपर हे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना इराणवरील संभाव्य लष्करी कारवाईबाबत माहिती देणार आहेत. इराणच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करून 'छोटे पण विध्वंसक' हल्ले करण्याची योजना अमेरिकेने आखली आहे. इराणने या आठवड्यात होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्यासाठी एक नवा प्रस्ताव दिला होता. मात्र, इराण प्रामाणिकपणे चर्चा करत नसल्याचे सांगत ट्रम्प यांनी हा प्रस्ताव फेटाळला. उलट, इराणने अण्वस्त्र कार्यक्रम सोडेपर्यंत तिथल्या बंदरांची नाकेबंदी (ब्लॉकेड) अनेक महिने सुरू ठेवण्याचे आदेश ट्रम्प यांनी दिले आहेत अमेरिकेच्या या कठोर भूमिकेनंतर जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती ७ टक्क्यांनी वधारल्या आहेत.या घडामोडींमुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर चार वर्षांतील उच्चांकी पातळीवर



पोहोचले आहेत. 'एक्सिओस'च्या अहवालानुसार, अमेरिकन सेंट्रल कमांडचे प्रमुख ॲडमिरल ब्रॅड कूपर हे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना इराणवरील संभाव्य लष्करी कारवाईबाबत माहिती देणार आहेत. ब्रेंट क्रूडचा दर प्रति बॅरल १२६ डॉलर्सच्या पार गेला आहे. इराणने इशारा दिला आहे की, परिस्थिती न सुधारल्यास हे दर १४० डॉलर्सपर्यंत जाऊ शकतात.

### समुद्री नाकेबंदीचा प्रभाव

अमेरिकन नौदलाने आतापर्यंत ४२ जहाजे रोखली आहेत. यामध्ये ४१ तेलवाहू टँकर्सचा समावेश असून, त्यात सुमारे ६.९ कोटी बॅरल तेल अडकले आहे. याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे ६ अब्ज डॉलर्स इतकी आहे. सायबर युद्धाचा

### प्रमुख प्रतिक्रिया

"अमेरिकेची ही नाकेबंदी आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन असून ती पूर्णपणे अपयशी ठरेल. ही एक प्रकारची समुद्री चाचेगिरी आहे आणि इराण याचे चोख प्रत्युत्तर देईल."

> डोनाल्ड ट्रम्प: इराणला आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे खिळखिळे करण्यासाठी दीर्घकालीन नाकेबंदीची रणनीती आखण्यात आली आहे. स्थितीचे विश्लेषण आणि परिणाम क्षेत्र

* इंधन दर | कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाल्याने जगभरात महागाई वाढण्याची शक्यता.

* पुरवठा साखळी | होर्मुझ मार्ग बंद राहिल्यास जागतिक व्यापाराला मोठा फटका बसेल. * भारतीय अर्थव्यवस्था | भारताच्या तेल आयातीवर आणि परकीय चलन साठ्यावर याचा मोठा ताण पडू शकतो.

* लष्करी संघर्ष | मर्यादित हल्ल्यांचे रूपांतर पूर्णवेळ युद्धात होण्याचा धोका वाढला आहे. सध्या आखाती देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती असून आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष आता अमेरिकेच्या पुढील पाऊलाकडे आणि इराणच्या प्रतिक्रियेकडे लागले आहे.

## पिंपरीत 'त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर सृष्टी'चे भूमिपूजन

जन सम्राट टाईम्स

**पुणे| प्रतिनिधी**

पिंपरी येथे उभारण्यात येणाऱ्या 'त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी' प्रकल्पाचे भूमिपूजन केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते संपन्न झाले. या वेळी त्यांनी माता रमाईंच्या त्याग, समर्पण आणि संघर्षमय जीवनाचा गौरव करत हा प्रकल्प केवळ वास्तू नसून सामाजिक परिवर्तनाचा प्रेरणास्त्रोत ठरेल, असे प्रतिपादन केले. रमाईंचा त्याग: इतिहासाला दिशा देणारी शक्ती "त्यागमूर्ती माता रमाई या संघर्ष आणि समर्पणाची जिवंत प्रतिमा होत्या.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवमुक्तीच्या कार्याला भक्कम साथ दिली. बाबासाहेबांनी देशाला विचार, संविधान आणि स्वाभिमान दिला, तर त्या विचारांना उभे राहण्यासाठी रमाईंच्या निःस्वार्थ साथीची मोठी भूमिका होती," असे आठवले म्हणाले. प्रकल्पाचे भूमिपूजन उत्साहात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (भीमसृष्टी) परिसरात उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला डॉ. भीमराव आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर रवि लांडगे होते. शायरीतून बाबासाहेबांना अभिवादन कार्यक्रमात रामदास आठवले यांनी त्यांच्या खास शैलीत शायरी सादर करत बाबासाहेबांना अभिवादन केले. "बाबासाहेबांकडे नव्हती पैशांची कमाई, पण त्यांच्या मागे उभी होती रमाई... माझा भीम आहे चमकता तारा, त्याचा अपमान केला तर वाजवू बारा..." या शायरीला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

» Selected

## एका हेलिकॉप्टरवरून डागली दोन क्षेपणास्त्रे

नवी दिल्ली: भारतीय नौदल आणि संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) ने एका हेलिकॉप्टरवरून एकाच वेळी दोन क्षेपणास्त्रे डागण्याची ऐतिहासिक आणि यशस्वी चाचणी घेतली आहे. या तंत्रज्ञानाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, क्षेपणास्त्र हवेत असतानाही गरज भासल्यास त्याचे लक्ष्य (टार्गेट) बदलणे शक्य आहे. या यशामुळे भारतीय नौदलाची मारक क्षमता लक्षणीयरीत्या वाढली असून, शत्रूच्या फिरत्या लक्ष्यांवर अचूक मारा करणे आता अधिक सुलभ होणार आहे.

## शिस्तभंगाबद्दल रियान परागला दंड

मुंबई: राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग याच्यावर आयपीएल प्रशासनाने कडक कारवाई केली आहे. पंजाब किंग्सविरुद्ध चंदीगडमध्ये झालेल्या सामन्यादरम्यान ड्रेसिंग रूममध्ये 'ई-सिगारेट' ओढतानाचा त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. खेळाडूंच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी परागच्या मॅच फीमध्ये २५ टक्क्यांची कपात करण्यात आली आहे. कर्णधार असूनही अशा प्रकारचे वर्तन केल्यामुळे त्याच्यावर क्रिकेट वर्तुळातून टीका होत आहे.

### महाराष्ट्र दिनी आरोग्यमंत्री करणार व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उद्घाटन

# रावेरमध्ये आजपासून मोफत डायलिसीस सेवा!

### ग्रामीण भागातील रुग्णांना मोठा दिलासा; सात जिल्ह्यांत एमआरआय सेवेचे लोकार्पण

जन सम्राट टाईम्स

**पाळधी/जळगाव प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून राज्यातील आरोग्य सेवेला बळकटी देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सात जिल्ह्यांमध्ये एमआरआय सेवा सुरू करण्यात येत असून जळगावसह ११ जिल्ह्यांमध्ये मोफत डायलिसीस सेवांचा विस्तार करण्यात येत आहे. या सर्व सेवांचे लोकार्पण सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणाली (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे करण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णांना अत्याधुनिक उपचार सुविधा घराजवळ उपलब्ध होणार आहेत. या योजनेतून जळगाव जिल्ह्यातील रावेर रुग्णालयात मोफत डायलिसिस सेवा उपलब्ध होणार आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय डायलिसीस कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील विविध आरोग्य संस्थांमध्ये डायलिसीस सेवा पुरविण्यात येत आहे. याच अनुषंगाने कोल्हापूर, यवतमाळ, बीड, नाशिक, जळगाव, सोलापूर, सातारा, सिंधुदुर्ग, ठाणे, गडचिरोली आणि रत्नागिरी या ११ जिल्ह्यांतील ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये डायलिसीस सेवा सुरू करण्यात येत



आहे. या सेवेमुळे किडनी विकारग्रस्त रुग्णांना नियमित व मोफत उपचार मिळणार असून, प्रवासाचा त्रासही कमी होणार आहे. राज्यातील ९२ आरोग्य संस्थांमध्ये सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर डायलिसीस सेवा यापूर्वीच कार्यान्वित करण्यात आली आहे.

MAHADIALYSIS — Lifeline for Your Kidneys — महाडायलिसिस — आपल्या किडनीची जीवनवाहिनी

ही सेवा सर्व रुग्णांसाठी पूर्णपणे नि:शुल्क असून, गुणवत्तापूर्ण उपचार ग्रामीण भागातच उपलब्ध करून देण्याचा सरकारचा उद्देश आहे.

**शासकीय रुग्णालयांमध्ये एमआरआय सेवा**

यासोबतच भंडारा, बुलढाणा, अमरावती, नांदेड, धाराशिव, हिंगोली आणि परभणी या सात जिल्ह्यांतील शासकीय रुग्णालयांमध्ये एमआरआय सेवा सुरू करण्यात येत आहे. या सेवा २४x७ उपलब्ध राहणार असून सर्व शासकीय रुग्णांसाठी पूर्णपणे मोफत असतील. या प्रकल्पासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ, जसे की टेक्निशियन व रेडिओलॉजिस्ट, हे सेवापुरवठादारा मार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

एमआरआय ही आधुनिक वैद्यकीय तपासणी पद्धत असून, शरीरातील अंतर्गत अवयवांचे सविस्तर व उच्च गुणवत्तेचे चित्र मिळवण्यासाठी ती उपयुक्त ठरते. यामुळे अचूक निदान, रोगाचे स्वरूप समजणे, उपचाराचे योग्य नियोजन करणे आणि उपचारांना मिळणारा प्रतिसाद तपासणे शक्य होते.

**लोकार्पण करण्यात येणारी डायलिसीस केंद्रे**

- कोल्हापूर (मुरगुड), यवतमाळ (दारव्हा), बीड (केज), नाशिक (इगतपुरी), जळगाव (रावेर), सोलापूर (मंगळवेढा), सातारा (ढेबेवाडी), सिंधुदुर्ग (वेंगुर्ला), ठाणे (बदलापूर), गडचिरोली (कुरखेडा), रत्नागिरी (दापोली).

**लोकार्पण करण्यात येणारी एमआरआय केंद्रे**

- भंडारा, बुलढाणा, अमरावती (संदर्भ सेवा रुग्णालय), नांदेड, धाराशिव, हिंगोली, परभणी. या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम होणार असून, विशेषतः ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.

# भीमज्योत विश्वाला प्रकाशाची वाट दाखवेल : रामदास आठवले

जन सम्राट टाईम्स

**पुणे :** | "संविधानाचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने लोहपुरुष, शक्तिपुरुष व द्रष्टे नेते होते. बाबासाहेबांच्या विचारांवर आणि संविधानाच्या तत्वांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्य करीत आहेत. भाजपने सर्व समाजाला सोबत घेऊन 'सबका साथ, सबका विकास' ही भूमिका मांडली असून, बाबासाहेबांचे संविधान मजबूत करण्यासाठी दीक्षाभूमी ते चैत्यभूमी असा प्रवास करत निघालेली ही भीमज्योत अवघ्या विश्वाला प्रकाशाची वाट दाखवेल," असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भाजप अनुसूचित जाती मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने प्रदेशाध्यक्ष विश्वजित अनिलकुमार गायकवाड यांच्या संकल्पनेतून 'भारताची भीमज्योत' दीक्षाभूमी ते चैत्यभूमी, बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारताचा अनुभव देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. गंज पेठेतील सावित्रीबाई फुले स्मारकात झालेल्या या कार्यक्रमावेळी रामदास आठवले बोलत होते.

**दलित, सवर्ण व बहुजन समाजाला एकत्र आणणार**

रामदास आठवले म्हणाले, "दलित, सवर्ण व बहुजन समाजाला एकत्र आणण्यासाठी माझा प्रयत्न आहे. बुद्धाचे तत्वज्ञान अंगीकारत बाबासाहेबांनी संपूर्ण मानवजातीचे कल्याण करणारे संविधान देशाला दिले. संविधान कोणीही बदलू शकत नाही. काँग्रेस आणि विरोधी पक्ष केवळ तशा वावड्या उठवत आहे. मात्र, चैत्यभूमीवर



भव्य स्मारक साकारण्यात नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनीच पुढाकार घेतल्याचे आपण पाहिले. विश्वजित गायकवाड यांच्यासारख्या युवकाला पाठबळ देण्याचे काम भाजप करीत आहे. मी ज्यांच्यासोबत असतो, त्यांची सत्ता आल्याशिवाय राहत नाही. जोवर मी भाजपसोबत आहे, तोवर भाजपाची सत्ता येणार असून, मला चौथ्यांदा मंत्री होण्याची संधी मिळणार आहे."

**अपप्रचार खोडण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाचे - धीरज घाटे**

धीरज घाटे म्हणाले, "अपप्रचार खोडण्यासाठी असे उपक्रम गरजेचे आहेत. बाबासाहेबानी चळवळीला आयुष्य दिले, समाज उभा राहिला, देशाच्या विकासात योगदान दिले. बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाच्या आदर्शांना समोर ठेवून वाटचाल करूया. देशाला प्रगतीच्या शिखरावर घेऊन जाऊया." याप्रसंगी माजी मंत्री भाई गिरकर, उपमहापौर परशुराम वाडेकर, भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी खासदार सुनील गायकवाड, 'रिपाइं' चे शहराध्यक्ष संजय सोनावणे, नगरसेवक अजय खेडेकर, पल्लवी जावळे, मनीषा लडकत, अमर आवळे, नंदा आबनावे, प्रियांका शेंडगे, अर्चना जगताप, हर्षदा भोसले, वीणा घोष, निलेश आल्हाट यांच्यासह पुणे व पिंपरी-चिंचवड येथील पदाधिकारी उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## बच्चू कडूंचा शिवसेनेत प्रवेश; 'धनुष्यबाण' हाती

### विधानपरिषदेच्या उमेदवारीचीही घोषणा



जन सम्राट टाईम्स

**मुंबई |** गेल्या काही दिवसांपासून रंगलेल्या राजकीय चर्चांना पूर्णविराम देत प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी अखेर शिवसेना मध्ये अधिकृत प्रवेश केला. "धनुष्यबाण पुन्हा हाती घेत आहे," असे स्पष्ट करत त्यांनी आपल्या नव्या राजकीय प्रवासाची दिशा जाहीर केली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बच्चू कडू यांच्या विधानपरिषदेच्या उमेदवारीचीही घोषणा केली.

पक्षप्रवेशाच्या निर्णयामागे ठोस भूमिका असल्याचे बच्चू कडूंनी स्पष्ट केले. "शिवसेनेनं आमचे सर्व मुद्दे मान्य केले आहेत. हमीभावातील सुधारणा, 'लाडक्या बहिणी' योजनेतील विधवा महिलांचा प्रश्न, तसेच दिव्यांग मंत्रालयाचे बळकटीकरण या मुद्द्यांवर सहमती झाल्यानंतरच मी हा निर्णय घेतला," असे त्यांनी सांगितले. "मी प्रामाणिकपणे काम करत राहीन. शिवसेनेची ताकद वाढवण्याबरोबरच शेतकरी आणि दिव्यांगांच्या हक्कांसाठी संघर्ष सुरूच राहील. त्यांच्या प्रश्नांवर कोणतीही तडजोड होणार नाही," असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. 'आता पुढची १५-२० वर्षे शिवसेनेतच' पक्षप्रवेशानंतर बच्चू कडूंनी भविष्यातील राजकीय दिशा स्पष्ट करत सांगितले, "माझी सुरुवात शिवसेनेपासून झाली होती. आता पुन्हा त्या घरात आलो आहे. पुढील १५-२० वर्षे मी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालीच राजकारण करणार आहे.

**विधानपरिषदेसाठी उमेदवारी जाहीर**

या प्रवेशावेळी एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषद निवडणुकीसाठी बच्चू कडू आणि नीलम गोऱ्हे यांच्या नावांची घोषणा केली. त्यामुळे आगामी राजकीय समीकरणांमध्ये शिवसेनेची ताकद वाढणार असल्याचे संकेत मिळत आहेत. राजकीय चर्चांना पूर्णविराम गेल्या काही दिवसांपासून बच्चू कडूंच्या पक्षांतराच्या चर्चा रंगत होत्या. प्रहार संघटना शिवसेनेत विलीन होणार का, याबाबतही तर्कवितर्क लावले जात होते. अखेर आजच्या निर्णयाने या सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

# धुळे वैद्यकीय महाविद्यालयात विषाणू निदान प्रयोगशाळा उभारणार : मुख्यमंत्री

### नागपूरमध्ये राज्यस्तरीय प्रयोगशाळा; राज्यातील सहा वैद्यकीय महाविद्यालयात आता होणार विषाणू निदान

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** राज्यात आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे. याअंतर्गत नागपुरात राज्यस्तरीय प्रयोगशाळा, तर धुळे येथील वैद्यकीय महाविद्यालयासह राज्यातील सहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आधुनिक विषाणू निदान प्रयोगशाळा (हायटेक व्हायरस टेस्टिंग लॅब) उभारण्यास मान्यता देण्यात आली. केंद्र शासनाच्या आरोग्य संशोधन विभागामार्फत देशभर १५० अत्याधुनिक विषाणू प्रयोगशाळा उभारण्यात येत आहेत. महाराष्ट्राकडून १३ जुलै २०१७ रोजी तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्र्यांना पत्र लिहून, मुख्यमंत्र्यांनी उपक्रमाचे स्वागत केले होते. यात महाराष्ट्राला योग्य वाटा देण्याची मागणीही पत्रात करण्यात आली होती. देशाच्या मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागपूर आणि राज्याची राजधानी मुंबई येथे राज्यस्तरीय प्रयोगशाळा तसेच राज्यातील विविध विभागांतील दहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा मंजूर करण्याची विनंती करण्यात आली होती. केंद्र शासनाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे राज्यस्तरीय विषाणू प्रयोगशाळा मंजूर केली. याशिवाय इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच अकोला, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, धुळे आणि मिरज येथील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उभारण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून एकूण २९ कोटी २१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. या निधीतून अत्याधुनिक यंत्रसामग्री खरेदी करून प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आल्या. कोविड-१९ महामारीच्या काळात या प्रयोगशाळांनी आरटी-पीसीआर चाचण्यांद्वारे मोठी भूमिका बजावली होती.



**विविध विषाणूजन्य आजारांचे निदान**

याशिवाय, या प्रयोगशाळांमुळे विविध विषाणूजन्य आजारांचे निदान करणे शक्य झाले आहे. आतापर्यंत कोविड-१९ (३७,२१,१५४), डेंग्यू (८८,३२७), चिकनगुनिया (३९,८१७), झीका (३,९२३), स्क्रब टायफस (७,०९१), इन्फ्लुएंझा (२७,५३६), एचबीव्ही (१,५३,१८०), रोटाव्हायरस (६५१) अशा एकूण ४०,४१,६८९ रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळाली असून भविष्यात उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारांशी लढण्यासाठी राज्य अधिक सक्षम झाले आहे.

# भालगाव फाट्याजवळ एसटी बसचा भीषण अपघात

### १८ प्रवासी जखमी ; चालकाची प्रकृती गंभीर

जन सम्राट टाईम्स

**|एरंडोल |**

एरंडोलपासून काही अंतरावरील भालगाव फाटा परिसरात आज सकाळी धुळेहून भुसावळकडे जाणाऱ्या एसटी बसचा भीषण अपघात झाला. भरधाव वेगातील बसवरील चालकाचे अचानक नियंत्रण सुटल्याने बस रस्त्यालगतच्या डिव्हायडरवर जोरात आदळली. या अपघातात एकूण १८ जण जखमी झाले असून काही प्रवाशांना गंभीर दुखापत झाल्याची माहिती मिळाली आहे. अपघातग्रस्त बस क्रमांक एमएच



२० बीएल ३४१२ मध्ये १५ प्रवासी, १ चालक, १ वाहक तसेच राज्य परिवहन महामंडळाचा १ कर्मचारी प्रवास करत होता. धडक इतकी जोरदार होती की बसमधील प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले व जखमींना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या दुर्घटनेत बस चालकाच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. चालकाचे बसवरील नियंत्रण अचानक सुटल्याने हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. दरम्यान, भालगाव फाटा परिसरातील सुरू असलेले रस्त्याचे काम, डिव्हायडरची रचना तसेच एसटी चालकांवरील वाढता कामाचा ताण या बाबींची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. वारंवार घडणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

# कामगारांच्या कल्याणातून घडतोय समृद्ध महाराष्ट्र !





**वृषाली पाटील**
सहायक संचालक (माहिती), कोल्हापूर

दरवर्षी 1 मे महाराष्ट्र दिन हा कामगार दिन म्हणूनही उत्साहाने साजरा केला जातो. देशात महाराष्ट्र हा अतिशय कुशल अशा कामगारांचा प्रांत म्हणून ऐतिहासिक काळापासून ओळखला जातो. देशाला दिशादर्शक अशा अनेक कामगार कायद्यांची निर्मिती महाराष्ट्राने केली आहे. कामगारांचे कायदे, कामगारांच्या संघटना, कामगारांसाठी आरोग्य व अन्य सुविधा आणि कामगारांच्या कुटुंबीयांना देखील मोठ्या प्रमाणात सुविधा देणारे प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्राचे नाव घेतले जाते. त्यामुळे एक मे रोजी कामगार दिन साजरा करताना संघटित, असंघटित सर्व क्षेत्रातील कामगारांनी आपल्या कायद्यांची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य शासनाने तयार केलेल्या सर्व कायद्यांचा कामगारांना लाभ होण्यासाठी कामगार विभाग कटिबद्ध असून कामगारांच्या कल्याणातूनच समृद्ध महाराष्ट्र घडत आहे.. कामगारांच्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, त्यांच्या सर्वांगीण उत्थानासाठी नाविन्यपूर्ण आणि दूरदर्शी योजना, दूरदर्शी उद्दिष्टे आणि हितकारक धोरणे परिणामकारकरित्या राबवून महाराष्ट्राने इतर राज्यांसाठी आदर्श निर्माण केला आहे. राज्याच्या सर्वांगीण प्रगतीतही हा विभाग मोलाचे योगदान देत आहे. या विभागांतर्गत संघटीत व असंघटीत कामगारांसाठी व्यापक स्वरुपात काम केले जात असून, त्यांच्या कल्याणासाठी कामगार कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी व विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. औद्योगिक संबंध अधिक दृढ करणे, कामगारांचे हक्क सुरक्षित ठेवणे आणि औद्योगिक सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करणे ही कामगार विभागाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. राज्यातील कामगारांसाठी आवश्यक कायदे तयार करणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे काम या विभागामार्फत सातत्याने केले जाते. औद्योगिक वादांचे प्रतिबंध व तातडीने निराकरण करण्यासाठीही हा विभाग कटिबद्ध आहे. या संहितांमुळे कामगारांचे किमान वेतन, कामाच्या वेळा, बोनस यांसारख्या महत्त्वाच्या बाबी निश्चित करण्यात आल्या आहेत. तसेच नव्याने कामगारांना नियुक्तीपत्र देणे बंधनकारक करण्यात आले असून, पारदर्शकता वाढीस लागली आहे. सामाजिक सुरक्षा संहितेमध्ये प्लॅटफॉर्म वर्कर्स- उदा. स्विगी, ॲमेझॉनसारख्या घरपोच सेवा देणाऱ्या कामगारांसाठी देखील स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या वतीने नव्या नियमावलीचा मसुदा- कामगार क्षेत्रातील कायदे अधिक सुलभ आणि प्रभावी करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने कामगार दिनाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. केंद्र सरकारच्या संहितांच्या धर्तीवर राज्य शासनाने राज्यासाठी नवीन नियमावलीचा मसुदा प्रसिद्ध केला आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# जिद्द आणि चिकाटीचा विजय: शेतमजुराचा मुलगा ठरला 'आदर्श शिक्षक'

### शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून घडवत आहेत हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य

जन सम्राट टाईम्स

**जळगाव** :"जिद्द असेल तर परिस्थिती कधीच अडथळा ठरत नाही," हे वाक्य प्रत्यक्षात उतरवून दाखवणारे जळगाव जिल्ह्यातील योगेश महाजन आज अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. एका सामान्य शेतमजुराच्या कुटुंबात जन्मलेले योगेश महाजन यांनी अथक परिश्रम, चिकाटी आणि शिक्षणाच्या बळावर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना नुकताच 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात



आला. संघर्षातून घडलेला प्रवास अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वाढलेल्या योगेश महाजन यांच्या आयुष्यात आर्थिक अडचणी नेहमीच होत्या. वडील शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असताना, घरात शिक्षणाची कोणतीही पार्श्वभूमी नव्हती. मात्र, परिस्थितीवर मात करत त्यांनी शिक्षण पूर्ण केले आणि शिक्षणालाच आपले ध्येय बनवले शिक्षणातून समाजघडणीचा ध्यास योगेश महाजन यांनी छोट्याशा स्तरावर सुरू केलेले शैक्षणिक कार्य आज मोठ्या प्रमाणावर विस्तारले आहे.

**'श्री क्लासेस' :** शालेय व स्पर्धा परीक्षांसाठी दर्जेदार मार्गदर्शन देत हजारो विद्यार्थ्यांना यशाच्या मार्गावर नेत आहे. 'शीतल अकॅडमी' : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा इंग्रजी भाषेतील न्यूनगंड दूर करून त्यांना आत्मविश्वासाने उभे करत आहे.

**'श्री नेक्स्टजेन कॉम्प्युटर्स' :** डिजिटल युगाशी सुसंगत कौशल्ये देत विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करत आहे. या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे.

**पुरस्काराने सन्मानित कार्य**

शैक्षणिक क्षेत्रातील निस्वार्थ योगदान आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या पुढाकारामुळे योगेश महाजन यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील विविध स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.

**भावनिक प्रतिक्रिया**

"माझ्या वडिलांनी शेतात घाम गाळून मला शिकवले. हा पुरस्कार माझ्या आई-वडिलांच्या कष्टाचा आणि विद्यार्थ्यांच्या विश्वासाचा आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक मुलगा तांत्रिकदृष्ट्या सक्षम व्हावा, हेच माझे स्वप्न आहे," अशी भावना योगेश महाजन यांनी व्यक्त केली